# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १४५-२२** **दिनांक :- २०/०५/२०२२**

## ४ वर्षापासून फरार असलेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीतास गुन्हे शाखा युनिट-१ ने ठोकल्या बेड्या.

दिनांक ०८/११/२०१८ रोजी रात्री २०.०० वाजताचे सुमारास श्री. राजबहादुर रामलाल पटेल, वय ३७ धंदा-कार चालक हे त्यांची एक्संट कार क्रं. एम एच-४७/एन-१६२६ ही पार्कीगमध्ये पार्क करुन घरी जात असताना अजय जयस्वाल यांचे भंगार दुकानालगत असलेल्या गल्लीत गौराईपाडा नाका, संतोष भुवन, नालासोपारा पुर्व येथे आरोपीत नामे सचिन सुनील उपाध्याय याने दारु पिण्यास पैसे दिले नाही म्हणून मनात राग धरुन राजबहादुर पटेल यांचे डोक्यावर लाकडी दांडक्याने फटका मारला असता त्यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवून व मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होवून त्यांचेवर जे. जे. हॉस्पीटल, मुंबई येथे औषधोपचार सुरु असताना दिनांक ११/११/२०१८ रोजी दुपारी १३.१५ वा. ते मयत झाले होते. सदर बाबत मयताची पत्नी फिर्यादी सौ. उर्वशा रामबहादुर पटेल वय ३५, रा. मारुती चाळ, रंम नं. २१, गौराईपाडा नाका, संतोष भुवन, नालासोपारा पुर्व यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. १२/११/२०१८ रोजी तुळींज पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. १२४०/२०१८ भादंवि ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा केल्यापासून यातील आरोपी नामे सचिन सुनिल उपाध्याय हा मागील ४ वर्षापासून फरार झालेला असतांना गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा यांचेमार्फत सदर गुन्हयाचा समांतर तपास चालू होता. आरोपीबाबत बातमीदाराचे मार्फत मिळालेल्या माहितीवरुन आरोपी नामे सचिन सुनील उपाध्याय यास शोधणेकामी गुन्हे शाखेचे अधिकारी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वाराणसी, उत्तर प्रदेश येथे रवाना झाले होते. वाराणसी येथे स्थानिक एस. टी. एफ. यांची मदत घेवून सलग सात दिवस अथक परिश्रम करुन आरोपीत नामे सचिन सुनील उपाध्याय रा. स्वारीपुर, पो. प्रमकापुर, मछली शहर, जि. जौनपुर, राज्य उत्तरप्रदेश यास आज दिनांक २०/०५/२०२२ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उपआयुक्त, (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ चे पो.निरी. अविराज कुराडे, सपोनि. पुष्पराज सुर्वे, स.फौ. संदिप शिंदे, किशोर वाडीले, पो.हवा./पुर्षेद्र थापा, अविनाश गर्जे, पो.शि./विकास राजपुत, सुमीत जाधव यांनी केलेली आहे.